# ऋतुरंगला मनोरंजनाचा तडका



**प्रथमेश दोंड,** पोदार कॉलेज
muntainbox@gmail.com

महाराष्ट्र टाइम्स
मीडिया पार्टनर

महाराष्ट्र विविधतेनं नटलेलं राज्य आहे. हीच महाराष्ट्राची संस्कृती आणि मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी माटुंगा येथील **पोदार कॉलेजने** 'ऋतुरंग' हा फेस्टिव्हल २३ आणि २४ सप्टेंबरला आयोजित केला आहे. या फेस्टचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर आहे. यंदा 'मराठी सिनेसृष्टी'वर आधारित ऋतुरंगची मध्यवर्ती संकल्पना असणार आहे. मुंबई आणि आसपासच्या २५हून अधिक कॉलेजांनी नावनोंदणी केली आहे. 'मराठी सिनेसृष्टी' थीम असल्यामुळे आठ इव्हेंट्सची विभागणी ब्लॉकबस्टर, सुपरहिट, हिट अशा तीन प्रकारात करण्यात आली आहे. तर स्पर्धक कॉलेजांना मराठी चित्रपटांची नावं देण्यात आली आहेत.

'मिस्टर अँड मिस ऋतुरंग' या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत स्पर्धकांनी आपली ओळख करुन द्यायची आहे, तर प्राथमिक आणि अंतिम फेरीत प्रश्नोत्तराचा खेळ रंगेल. प्राथमिक फेरीत सरप्राइज एलिमेंटही ठेवण्यात आला आहे. तर अंतिम फेरीत 'मिस्टर आणि मिस ऋतुरंग'चा मान मिळवण्यासाठी स्पर्धकांना आपल्यातील विशेष कला सादर करायची आहे. नृत्य विभागांतर्गत 'महाराष्ट्राची लोकधारा' ही स्पर्धा ठेवण्यात आली आहे. स्पर्धकांचं बुद्धीचातुर्य तपासणारी आणि सगळ्यात मजेशीर स्पर्धा म्हणजे शोध खजिन्याचा. अभिनयाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'नाट्यसंग्राम' ही स्पर्धा असेल. यात तीन वेगवेगळ्या चित्रपटातील व्यक्तिरेखा दिल्या जाणार आहेत, तीन व्यक्तिरेखा एकत्र आल्यानंतर काय होऊ शकतं हे स्पर्धकांना सादर करायचं आहे. तर 'रंगार्थ' या इव्हेंटमध्ये स्पर्धकांना मराठी चित्रपटांचे पोस्टर नव्याने तयार करायचे आहे.

## मनोरंजनातून सामाजिक संदेश

यंदा ऋतुरंगमध्ये पहिल्यांदा स्टँड अप कॉमेडीवर आधारित 'प्रयोग रंग विनोदाचे' ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या विनोदी कार्यक्रमाच्या माध्यमातून स्पर्धकांना आपल्या सादरीकरणातून सामाजिक संदेश द्यायचा आहे.

**महाराष्ट्राला वैभवशाली इतिहास आणि सांस्कृतिक वारसा लाभलाय, तो एखाद्या फेस्टिव्हलच्या माध्यमातून सगळ्यांपुढे मांडणं अशक्य आहे. तरीही दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र आणि मराठी भाषेची सांगड घालत 'मराठी सिनेसृष्टी' या संकल्पनेवर आधारित ऋतुरंगचं आयोजन करण्यात आलं आहे. यासाठी विद्यार्थ्यांना टीचर इन चार्ज स्वाती बांगर यांचं मार्गदर्शन लाभलं.**

– **वैष्णवी कोल्हे,** ऋतुरंग प्रमुख